# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/12/2022 (शुक्रवार) दुपार


---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०३ किमी. अंतरावर मौजा टाकळघाट खापरी चौक दिनांक ०१/१२/२०२२ चे १३.०० वा. दरम्यान यातील अल्पवयीन फिर्यादी/पिडीत वय १५ वर्ष रा. वार्ड क्र. ३ गोंडवाना ता. हिंगना जि. नागपुर ही शाळा सुटल्यानंतर आपल्या इतर चार मैत्रीणीसह सायकलने घरी जात असता सायकलमध्ये हवा भरण्याकरिता सायकल स्टोअर्स येथे थांबली असता यातील आरोपी नामे— १) राजा हनुमंत लष्कर, वय २० वर्ष, रा. शिक्षक कॉलनी, टाकळघाट ता. हिंगना जि. नागपुर २) रूषीकेश बाबारावजी निखाडे, वय २० वर्ष, रा. जिजामाता चौक, टाकळघाट ता. हिंगना जि. नागपूर ३) विधीसंघर्ष ग्रस्त बालक वय १७ वर्ष, रा. वार्ड क्र. ४ टाकळघाट ता. हिंगना जि. नागपुर तिथे येवून त्यातील एकाने फिर्यादीला म्हटले की, ''माझा मित्र गुल्लु हा तुला लाईक करतो त्याने आम्हास पाठवीले आहे'' असे म्हटले असता फिर्यादीने त्यांना हटकले व मैत्रीणीसह सायकलने घरी जाण्यास निघाली असता यातील आरोपी हे मोटार सायकलने फिर्यादी व तिचे मैत्रीणींचे मागे—मागे येवून फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी/पिडीत यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५४(ड), १०९ भादवी, सहकलम १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. १) ते २) यांना अटक करण्यात आली असुन आरोपी क्र. ३) हा (विधीसंघर्ष ग्रस्त असल्याने अटक नाही.) गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक आरती उघडे मो. नं. 8355947473 या करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. वेलतुर** :— अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा नवेगाव देवी येथे दिनांक ०२/१२/२०२२ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— राजेश सुखदेव घरडे, वय ४५ वर्ष, रा. नवेगाव देवी याने आरोपी नामे— कैलास कारूजी घरडे, वय ४५ वर्ष, रा. नवेगाव देवी याचे विरुद्ध दिलेल्या जुन्या वादाचे तक्रीवरुन आरोपीने फिर्यादीचे घरासमोरील रोडवर येवुन शिवीगाळ केली व स्वतःचे हातातील काडीने फिर्यादीचे दोन्ही पायावर मारपीट केल्याने पायाला मार लागला असुन पुन्हा घराबाहेर आला तर जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ३८४ मधुकर सुरपाम पोलीस स्टेशन वेलतुर मो. नं. ९७६४७१५६५८ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर